# Hearty thanks to Mr Amitabh Bachchan for expressing his desire to promote Gujarat

by Narendra Modi 10. January 2010 14:19

मित्रांनो,

2010 हे वर्ष अनेक शुभशकुन आणि शुभसंकेताने सुरु झाले आहे.

गुजरातमध्ये नव्या वर्षाच्या पहिल्या दिवशीच लोकशाहीचे जे मनोरम दर्शन झाले त्याने लोकशाहीवर विश्वास असणाऱ्या सगळया लोकांच्या मनात नवी आशा जागवली आहे. गुजरात राज्याच्या सुवर्ण महोत्सवानिमित्त आयोजित कार्यक्रमात राज्यातील सगळ्या राजकीय पक्षांचे आजी, माजी आमदार, खासदार, नगरसेवक या लोकप्रतिनिधींनी एकमताने आणि एका सुरात जो संकल्प केला, ती एक ऐतिहासिक घटनाच आहे. असो.

बराच व्यस्त असूनही खूप दिवसांनी चित्रपटगृहात जाऊन "पा" चित्रपट बघण्याची संधी मिळाली. त्यासाठी मी श्री. अमिताभ बच्चन यांचा आभारी आहे. त्यांनी मला निमंत्रण तर दिले होतेच पण ते स्वत:ही तिथे उपस्थित होते.

मी चित्रपट समीक्षक नाही. चित्रपटाचे विश्लेषण करणे या विषयी किंवा मनोरंजन क्षेत्राविषयीही मला फारशी माहिती नाही. एका प्रेक्षकाच्या भूमिकेतून मी हा चित्रपट मनापासून पाहिला. वाहत्या पाण्याप्रमाणे मनाला प्रवाहित करणाऱ्या या चित्रपटात बऱ्याच समाजोपयोगी गोष्टी आहेत. हिंसा अन अश्लीलता नाही असे चित्रपट हल्ली दुर्मिळ झाले आहेत. त्यामुळे अशा प्रकारचे सिनेमे पाहताना विशेष आनंद होतो. राजकारण अन राजकारणी यांचे कौतुक करण्यासाठी हल्ली हिंमत हवी. पारंपारिक चौकटीतून बाहेर पडून काही नवीन करुन दाखवावे लागते. 'पा' मध्ये अशी हिंमत नि वेगळेपणा आढळला.

श्री अमिताभ यांना मी पूर्वीही भेटलो आहे. पण निवांतपणे भेटण्याचा हा पहिलाच प्रसंग होता. माझ्या एका कवितेच्या ओळी

"मारा गुजरातने प्रेम करे ते मारो आत्मा,<br>
मारा भारतने प्रेम करे ते मारो परमात्मा."

(माझ्य गुजरातवर प्रेम करतो तो माझा आत्मा,<br>
माझ्या भारतावर प्रेम करतो तो माझा परमात्मा)

श्री. अमिताभ गुजरातवर इतके प्रेम करतात ही गोष्ट माझ्या मनाला किती भावली याचा अंदाज तुम्हाला आला असेलच.

गुजरातची सेवा करण्याची त्यांची इच्छा त्यांच्या वागण्या-बोलण्यातून खरोखरीच जाणवत होती. त्यांनी गुजरातचे कौतुक केले या गोष्टीचा विशेष आनंद तर आहेच पण वयाने जेष्ठ असणाऱ्या अमिताभजींनी सार्वजनिक ठिकाणी माझ्याविषयी काढलेले गौरवोद्गार, माझ्यासारख्या व्यक्तीला प्रोत्साहित करतात. पुढे जाण्याची शक्ती देतात.

याप्रसंगी मला हरिवंशराय बच्चन यांनी सरदार पटेलांसंदर्भात काढलेल्या गौरवोद्गारांची सुखद आठवण झाली. तुम्हीही त्याचा आस्वाद घ्या.

यही प्रसिद्ध लोह का पुरुष प्रबल,

यही प्रसिद्ध शक्ति की शीला अटल,

Copyright © 2009 NarendraModi.com

हलि इसे सका कभी न शत्रुदल,

पटेल पर स्वदेश को गुमान है.

सुबुद्धिउच्च श्रृंग पर किये जगह,

ह्रदय गंभीर है समुद्रकी तरह,

कदम छुए हुए जमीन की तरह,

पटेल देश का निगहबान है.

हरेक पक्षको पटेल तोलता,

हरेक भेद को पटेल खोलता,

दुराव या छिपाव से उसे गरज?

कठोर नग्नसत्यबोलता

पटेल हिंद की नीडर जबान है.

मित्रांने, हल्ली मी गरीब कल्याण मेळाव्याच्या मोहिमेत खूप व्यस्तआहे.

तुम्हा सर्वांना १२ जानेवारी - विवेकानंद जयंती तसेच १४ जानेवारीच्या मकरसंक्रांतीच्या हार्दिक शुभेच्छा.

आपला,

Copyright © 2009 NarendraModi.com